# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी : २५६०१२६०

फॅक्स : ०२०–२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ : प.प्रवेश/ ४४५६

दिनांक : २० . ९ . २०१२

प्रति,
**मा. विभागप्रमुख/मा. प्राचार्य,**
सर्व शैक्षणिक विभाग/संलग्नित सर्व महाविद्यालये.

**विषय** : क्रांतिज्योती सावित्रीमाता फुले अर्थसहाय्य योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याबाबतचे नियम व अटी.

महोदय/महोदया,

क्रांतिज्योती सावित्रीमाता फुले योजने अंतर्गत विद्यार्थिनींना विद्यापीठामार्फत अर्थसहाय्य देण्याची योजना सन २००७ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. या अर्थसहाय्य योजनेचे नवीन नियम व अटी तयार करण्यात आल्या असून सदरचे नियम व अटी शैक्षणिक वर्ष २०१२–१३ पासून अस्तित्वात येत आहेत. सदरचे नियम व अटी सोबत जोडल्या आहेत.

सन २०१२–१३ पासून क्रांतिज्योती सावित्रीमाता फुले अर्थसहाय्य योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यासाठी करण्यात येणारे अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येणार असून यासंदर्भात सविस्तर परिपत्रक नंतर जाहीर करण्यात येईल. सोबत जोडलेले नियम व अटी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन त्याप्रमाणे सर्व संबंधितांनी कार्यवाही करावयाची आहे.

कळावे,

आपला,

उपकुलसचिव,
पदव्युत्तर प्रवेश विभाग

# क्रांतिज्योती सावित्रीमाता फुले अर्थसहाय्य योजना नियम व अटी

शैक्षणिक गुणवत्ता असून देखील विद्यार्थीनी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून पुणे विद्यापीठाने क्रांतिज्योती सावित्रीमाता फुले अर्थसहाय्य योजना सुरु केलेली आहे.

## अ) नियम व अटी

१. विधवा, परित्यक्त्या, देवदासी, वारांगणा, एड्सग्रस्त, असंघटीत क्षेत्रातील स्त्री कामगार (शेतमजूर, घरकाम करणाऱ्या, कचरा वेचणाऱ्या, बिडी कामगार इ.) मातांच्या मुलींचा हे अर्थसहाय्य देताना प्राधान्याने विचार करण्यात येईल.

२. सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थीनीस संपूर्ण पदवी आणि पदव्युत्तर काळात एकदाच देण्यात येईल.

३. पात्र विद्यार्थीनीस रू. ५०००/— अर्थसहाय्य देण्यात येईल.

४. विद्यार्थीनीच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १,५०,०००/— पेक्षा जास्त नसावे. यासाठी संबंधित तहसिलदाराचा दाखला आवश्यक राहील.

५. विद्यार्थिनीने मागील लगतच्या परीक्षेत किमान ५० टक्के गुण संपादित केलेले असावेत. ५० टक्यांपेक्षा जास्त गुण असलेल्या विद्यार्थिनींचा गुणांनुक्रमे विचार करण्यात येईल.

६. महाविद्यालय/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थीनीने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.

७. विद्यार्थिनीने व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला नसावा.

८. विद्यार्थीनीची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक राहील. या संदर्भात प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.

९. विद्यार्थीनीस या योजनेच्या कालावधीत कोणतीही पगारी नोकरी अथवा शिष्यवृत्ती स्विकारता येणार नाही.

१०. विद्यार्थीनीस गैरशिस्त/नैतिकता/परीक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.

११. अर्थसहाय्यासाठी विद्यार्थिनीच्या शैक्षणिक प्रगतीबरोबर इतर उपक्रमातील सहभाग उदा. क्रीडा, समाजसेवा, कला इ. विचारात घेण्यात येईल.

१२. विद्यार्थीनीने त्यांच्या बँक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बँकेचे नाव, पत्ता, खाते क्रमांक (एमआयसीआर कोड आणि आयएफएस कोड)

१३. अर्थसहाय्यासाठी विद्यार्थिनीची निवड करण्यासाठी महाविद्यालय पातळीवर मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठित करुन अर्जाची छाननी करुन पदवी अभ्यासक्रमाचे जास्तीत जास्त दहा व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे जास्तीत जास्त पाच विद्यार्थिनींचे अर्ज पाठवावेत.

१) मा. प्राचार्य (अध्यक्ष)
२) महाविद्यालयातील समन्वयक, विद्यार्थी कल्याण योजना
३) महाविद्यालयातील विविध शाखांच्या तीन प्राध्यापिका

१४. विद्यार्थीनीने आणि संबंधित प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरुन देणे आवश्यक राहील.

**ब) अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

१. तहसिलदाराचा उत्पन्नाचा दाखला.

२. विद्यार्थीनीच्या मागील लगतच्या अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत.

३. विद्यार्थीनी आणि प्राचार्यांचे एकत्रित हमीपत्र.

४. विद्यार्थीनीची उपस्थिती ७५ टक्यांपेक्षा जास्त असल्याबाबत मा. प्राचार्यांचे प्रमाणपत्र.

५. घटस्फोटीत, विधवा, देवदासी, वारांगणा, एड्सग्रस्त, असंघटीत क्षेत्रातील कामगार माता असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र.